


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १८६ वा सोमवार दि ०८ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# सरकारची नीती पक्की, ओबीसी समाजाच्या ताटातलं काहीच काढणार नाही- मुख्यमंत्र्यांचा मोठा शब्द

वृत्तसंस्था/बारामती

आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाच काढून दुसऱ्याला द्यायचं नाही, दोन समाजाला भिडवायचं नाही, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुरंदर तालुक्यातील कार्यक्रमात ओबीसी समाजाला दिलासा दिला. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत घेतलेल्या निर्णयात ओबीसींचे हित अबाधित राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इंग्रजांच्या फोडा आणि राज्य करा नीतीचा उल्लेख करत त्यांनी सर्व समाजांना सोबत घेऊन राज्य करण्याची सरकारची भूमिका स्पष्ट केली. पुरंदर तालुक्यात आज आयोजित कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, परवा मराठा समाजाच्या हिताचा विचार करताना ओबीसी समाजाचे अहित होणार नाही याला प्राधान्य दिलं आणि तसा निर्णय केला. मराठवाड्यात इंग्रजांचे शासन नव्हते, तर निजामांचे होते, याकडे लक्ष वेधत ते म्हणाले, कास्ट सर्टिफिकेट पाहिजे असेल तर इंग्रजांची रेकॉर्ड नाहीत. महाराष्ट्राच्या इतर भागात इंग्रज रेकॉर्ड उपलब्ध आहेत, पण मराठवाड्यात ते मिळत नव्हते. कारण सर्व रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. म्हणून आम्ही हैदराबाद गॅझेटमधील रेकॉर्ड चालतील असा निर्णय घेतला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ज्याच्याकडे नोंद असेल त्याला सर्टिफिकेट मिळणार आहे. सरसकट सर्टिफिकेट नाही. नोंद असलेल्यांनाच सर्टिफिकेट सोपी कार्यपद्धती आपण केली. खरी नोंद असलेला व्यक्ती वंचित राहणार नाही, त्याला फायदा होणार आहे. पण ओबीसी समाजाच्या ताटातील कुठलंही काढून घेण्याचं काम आम्ही केलेलं नाही. ओबीसी समाजाच्या विकासाबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, या निर्णयामुळे मराठा समाजाचे हित झालं आहे, पण ओबीसी समाजाचे बिलकुल अहित आम्ही होऊ दिलं नाही. काहीही झालं तरी ओबीसीचं अहित आम्ही होऊ देणार नाही. ते पुढे म्हणाले, ओबीसीचं स्वतंत्र मंत्रालय करणार हे सरकार आहे. वेगवेगळ्या १८ महामंडळाचा तयार करणारे सरकार आहे. आम्हालाही माहिती आहे, जोपर्यंत छत्रपती शिवरायांसोबत लढणाऱ्या १८ पगड जातींना आम्ही मुख्यधारेमध्ये आणणार नाही, तोपर्यंत शिवकार्य कधीच पूर्ण होऊ शकत नाही. ओबीसींचा विकास उद्धार म्हणजे शिवकार्य आहे, ते शिवकार्य केल्याशिवाय हे सरकार कधी थांबणार नाही. सरकारची कार्यशैली स्पष्ट करताना ते म्हणाले, आम्ही दबावापोटी काम करत नाही, समाजाच्या प्रेमापोटी काम करतो. कुठलाही समाज मागणी घेऊन आल्यानंतर त्यांच्या योग्य मागण्या पूर्ण करण्याचं काम आमचं सरकार यापुढेही करेल. समाजाच्या मागण्या कधीही संपत नसतात. एक संपली की दुसरी मागणी करायची असते. तुम्ही मागत रहा, आम्ही देत राहू. आम्ही का देऊ? तर तुम्ही आम्हाला निवडून दिल म्हणून. आम्ही आमच्या पदरचं खिशातील



देत नाही, आम्हाला तुम्ही देण्याचा अधिकार दिला. जे तुमचं आहे ते देण्याचं काम करत आहे. जेवढी क्षमता आहे तेवढ्या क्षमतेने. शेवटी ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज ज्या मार्गाने चालले, त्याच मार्गाने अठरापगड जातींना घेऊन चालू. या कार्यक्रमात ओबीसी आणि मराठा समाजातील प्रतिनिधी उपस्थित होते. हा निर्णय मराठवाड्यातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरला असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या चर्चांना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

# मानाच्या लाडका गणपतीचा मान खाकी वर्दीला खाकीने उधळले धार्मिक व सामाजिकतेचे रंग!

## एसपी निलेश तांबेंनी श्रींना घेतले डोक्यावर!

जनसंचलन/बुलढाणा

खामगाव येथील मानाच्या लाकडी गणपतीचे अद्वितीय महत्त्व आहे. काल विसर्जनाच्या दिवशी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी या लाकडी देवबाप्पांची व माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांनी सकाळी ९ वाजता महाआरती केली अन् विसर्जन मिरवणुकीला एकच रंगत आली होती. यावेळी खाकीने धार्मिक व सामाजिकतेचे विविध रंग उधळल्याचे चित्र दिसून आले. इत्र त्रित्र सर्वत्र गणेश उत्सव दहा दिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. अनंत चतुर्थीच्या दिवशी गणरायाचे पाणावल्या डोळ्यांनी विसर्जन करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव च्या प्रसिद्ध असलेल्या मानाच्या लाकडी गणपतीला विसर्जन मिरवणुकीमध्ये विशेष महत्त्व असते,अव्वल स्थानी श्री मानाचा लाकडी गणपती त्यांनंतर तानाजी गणेश मंडळ , हनुमान गणेश मंडळ व राणा गणेश मंडळ, ही चार मंडळ दरवर्षी मिरवणुकीच्या आधी असतात. त्यानंतर इतर गणेश मंडळाचे लकी ड्रॉ प्रमाणे काढण्यात आलेल्या नंबर नुसार एकुण २९ गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. विसर्जन मिरवणुकीच्या पूर्वी मानाच्या लाकडी गणपतीचे माजी आमदार दिलीप कुमार सानंदा व जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी गणरायाची आरती करून सकाळी ९ वाजता विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. यावेळी माजी आमदार दिलीप कुमार सानंदा त्यांच्या परिवारासह उपस्थित होते. तर मिरवणूक मार्गावर मुख्य ठिकाणी न.प. व पोलिस प्रशासनाच्यावतीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले. तर विसर्जन मिरवणूक मार्गावरील निर्मल टर्निंग ते राणा गेट व शिवाजी वेस हे बोरीपुरा पर्यंत संचारबंदी लावण्यात आली आहे. मिरवणुक मार्गावर सीसीटीव्ही



व ड्रोन कॅमेऱ्यांचीही करडी नजर राहणार आहे. तर राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर हे त्यांच्या तानाजी मंडळासह मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते.

# जीएसटीचा नवा अवतार

## संपादकीय लेख

अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारयुद्धामुळे निर्यातीला फटका बसण्याची भीती, युद्धांमुळे जगभरात विस्कळित झालेली पुरवठा साखळी आणि देशांतर्गत मागणीअभावी मंदावलेला विकास, अशा चिंता फेर धरत असतानाच वस्तू आणि सेवाकरामध्ये (जीएसटी) करण्यात आलेल्या सुधारणा क्रांतिकारी म्हणाव्यात, अशाच आहेत. हा कर लागू झाल्यापासून त्यातील चार स्तरांची किचकट रचना, वाढते दर आणि विविध पूर्ततांचे जंजाळ यांमुळे लाखो व्यावसायिक हैराण झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात या बदलांचे सूतोवाच केले होते. त्यानंतर अर्थ मंत्रालयाने सादर केलेल्या नव्या प्रस्तावास जीएसटी परिषदेनेही मान्यता दिल्यानंतर ५, १२, १८ आणि २८ टक्के, या पूर्वीच्या चार स्तरांऐवजी ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांची सुटसुटीत रचना लागू होईल. त्याशिवाय दुग्धजन्य पदार्थांपासून, कपडे, पादत्राणे आणि लहान मोटारी, दूरचित्रवाणी संचांपर्यंत अनेक वस्तूंवरील कर कमी करण्यात आल्याने बाजारपेठांमध्ये धामधूम होऊन दिवाळी गोड होण्याच्या आशा आहेत. विशेषतः वाढत्या उपचारखर्चाने हतबल झालेल्या लाखो कुटुंबांना विमा आणि आरोग्यविम्यावरील कर हटविण्यामुळे मोठाच दिलासा मिळाला आहे. देशातील अप्रत्यक्ष करणप्रणालीचा चेहरामोहरा बदलणारी ङ्गजीएसटीफ्ची रचना स्वीकारून आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. ३० जून २०१७ रोजी मध्यरात्री यासाठी भरलेल्या संसदेच्या अधिवेशनाची तुलना स्वातंत्र्यलढ्याशी करण्यात आली होती. मात्र, त्यातील गुंतागुंतीची रचना, कच्च्या मालावर अधिक आणि तयार उत्पादनांवर कमी करआकारणीसारख्या (इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर) अनेक विसंगती, वेगवेगळ्या पूर्ततेच्या अटींचे जंजाळ आणि चौपदरी आकारणी यांमुळे व्यावसायिक हैराण झाले होते. विरोधी पक्षांनी तर यावर ङ्गगब्बरसिंग टॅक्सफ अशी टीकास्त्रे सोडली होती. करांचे दोनच दर असावेत, ही मागणी विरोधकांसह अर्थतज्ज्ञांकडूनही करण्यात येत होती. त्याशिवाय कराचे पैसे जमा असतानाही परताव्याची कटकटींची प्रक्रिया आणि नोकरशाहीचा जाच यांमुळे व्यावसायिक वर्गात तीव्र संताप होता. या सगळ्याची दखल घेऊन सरकारने ङ्गजीएसटी २.०फ ची घोषणा केली आहे. अमेरिकेने लादलेले आयातशुल्क आणि जागतिक व्यापारयुद्धे यांच्याशी या निर्णयाचा संबंध जोडला जाणे साहजिक आहे; परंतु अर्थ मंत्रालयाकडून गेले सहा महिने या संदर्भात पूर्वतयारी सुरू होती, हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच जागतिक पातळीवर अत्यंत अस्थिर परिस्थिती असतानाही करसुधारणांचे ठाम पाऊल उचलण्यामागील प्रबळ राजकीय इच्छाशक्ती स्वागतार्ह आहेच; त्याशिवाय वेगवेगळ्या राज्यांमध्ये या बदलांवर सहमती घडविण्यासाठी अर्थ मंत्रालयाने केलेल्या प्रयत्नांनाही याचे श्रेय दिले पाहिजे. गेल्या काही काळापासून जगभरात मंदीचे सावट




दिसते आहे. करोनाकाळात ठप्प झालेले व्यवहार पूर्णतः मूळ पदावर आलेले नाहीत. उलटपक्षी युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीही विस्कळित झाली आहे. त्यातच अमेरिकेच्या प्रचंड आयातशुल्कामुळे भारताच्या निर्यातीवर परिणाम होऊन अनेक क्षेत्रांना याचा फटका बसण्याची भीती आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी देशांतर्गत मागणी वाढावी, अशी अपेक्षा अर्थतज्ज्ञ करीत होते. त्या पार्श्वभूमीवर वाजवी करआकारणी आणि सुलभ-सुटसुटीत करप्रणाली या कसोट्या पूर्ण करणाऱ्या बदलांमुळे देशांतर्गत मागणीत वाढ होऊन अर्थचक्राला गती मिळेल आणि रोजगारनिर्मितीची वाढेल, अशी आशा आहे. अनेक वस्तूंवरील कर कमी झाले असले, तरी हा स्वस्ताईचा सांगावा आहे का, हे स्पष्ट होण्यास काही कालावधी जावा लागेल; कारण कर कमी झाले, तरी त्याचे लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचण्यामध्ये व्यावसायिकांची भूमिका महत्त्वाची असेल. त्यांनी नफेखोरीला आवर घातला नाही, तर सरकारचे प्रयत्न व्यर्थ ठरतील. या निर्णयामुळे सरकारला महसुली तुटीचा सामना करावा लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे. मात्र, दर कमी करून प्रक्रिया सुलभ केल्यास कराचा पाया व्यापक होऊ शकतो; तसेच व्यवहारांमध्ये वाढ झाल्याने कररूपी उत्पन्नाचा मेळ घालता येतो, असाही अनेक देशांतील अनुभव आहे. राजकीय नफ्यातोट्याची गणिते मांडल्याखेरीज कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेतले जात नाहीत, हे मोदी सरकारचे सूत्र आहे. त्या दृष्टीने बिहार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयाकडे पाहता येते. या बहुप्रतीक्षित करसुधारणांमुळे करदात्यांच्या कटकटी कमी होण्याच्या आणि अर्थव्यवस्थेला गती मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# डिजीटल मीडिया पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचा एस.एम. देशमुख यांनी घेतला आढावा...

**जनसंचलन/ छत्रपती संभाजीनगर**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा आढावा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी शुक्रवारी घेतला.

छत्रपती संभाजीनगरातील क्रांतीचौक जवळील संत एकनाथ नाट्य मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी मराठी पत्रकार परिषदेची छत्रपती संभाजीनगर शाखा प्रयत्नशील आहे.

प्रिंट मीडियाबरोबरच डिजिटल मीडियानेही सध्या माध्यम क्षेत्रामध्ये मोठी झेप घेतली आहे. म्हणून अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने पत्रकारांसाठी डिजिटल मीडियाच्या रूपाने इलेक्ट्रॉनिक मीडियातील पत्रकारांसाठी व्यासपीठ स्थापन केले आहे.

डिजिटल मीडियातील पत्रकारांसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने पहिल्यांदाच राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगरात आयोजित केले आहे. अधिवेशनाच्या या तयारीचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांचे आधारस्तंभ श्री.एस.एम.देशमुख हे छत्रपती संभाजीनगरात शुक्रवारी आले होते.

एस.एम.देशमुख यांच्यासोबत परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश मोकाशी, प्रदेश सदस्य जितेंद्र शिरसाठ, डिजिटल मीडियाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर मुळे या मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रारंभी एस.एम.देशमुख यांचे स्वागत परिषदेचे जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. तसेच जिल्हा सरचिटणीस प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, कोषाध्यक्ष महादेव जामनिक यांनी परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश मोकाशी, प्रदेश सदस्य जितेंद्र शिरसाट, विश्वंभर मुळे



या मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी एस.एम. देशमुख यांनी संत एकनाथ नाट्यमंदिर व परिसराची पाहणी करून अधिवेशन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुंबईत शॉर्टसर्किटमुळे २३ मजली इमारतीला भीषण आग

# गुदमरुन ८० वर्षीय महिलेचा मृत्यू, १९ जण जखमी...

**मुंबई :** दहिसर पूर्वेकडील एस.व्ही. रोड शांतीनगरमधील न्यू जनकल्याण सोसायटी या २३ मजली इमारतीत रविवारी दुपारी तीनच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग चौथ्या मजल्यापर्यंत पसरली. त्यामुळे अग्निशमन दलाने अडकलेल्या ३६ जणांची सुटका केली. १९ जण जखमी झाल्याने त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. यामध्ये धुरामुळे अनेक जण गुदमरले. त्यापैकी एका ८० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मुंबई महापालिकेकडून देण्यात आली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.दहिसर पूर्वेला शांतीनगरमध्ये २३ मजली न्यू जनकल्याण सोसायटी आहे. रविवारी दुपारी या इमारतीच्या तळमजल्यापासून ते चौथ्या मजल्यापर्यंत आग लागली. या इमारतीच्या तळघरात असलेल्या दोन मीटर केबिनला आग लागल्यानंतर ही आग पसरत गेली. इलेक्ट्रिक वायर, केबल आदींमुळे आग पसरताना ती इलेक्ट्रिक डक्टमधूनही पसरली. इमारतीत झालेल्या प्रचंड धुरामुळे अनेकांना श्वास कोंडला. घाबरलेल्या काही रहिवाशांनी इमारतीच्या बाहेर धाव घेतली. तर काहींनी सुरक्षित ठिकाण म्हणून इमारतीच्या गच्चीवर जाणे पसंत केले. परिसरातील अनेकांनी आग लागलेल्या इमारतीतील रहिवाशांचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अनेकांकडून मदतीसाठी हाकही देण्यात येत होती.इमारतीतील रहिवाशांसह स्थानिकांनी तात्काळ अग्निशमन दल, पोलिसांना याची माहिती दिली. ही आग एवढी भीषण



होती की अग्निशमन दलाकडून लेव्हल दोनची आग घोषित करण्यात आली.सात फायर इंजिन, वॉटर टँकर व अन्य यंत्रणेसह घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. आग पसरत असल्याने आणि धुरामुळे त्यावर नियंत्रण मिळवताना अग्निशमन दलाला अडचणी येत होत्या. तरीही त्या परिस्थितीत अग्निशमन दलाने आगीवर हळूहळू नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. नियंत्रण मिळवताच इमारतीत अडकलेल्या ३६ जणांची सुटका केली.


## ३५ तासांनंतर लाडक्या लालबागच्या राजाचं विसर्जन, भाविकांच्या डोळ्यांत पाणी...

**मुंबई:** मुंबईचा प्रसिद्ध लालबागचा राजा चं अखेर ३५ तासांनी विसर्जन झालं आहे. गिरगावच्या खोल समुद्रात राजाचं विसर्जन करण्यात आलं. यावेळी भाविक आणि मंडळ कार्यकर्ते अत्यंत भावूक झाले होते. आज सकाळी आठ वाजता लालबागचा राजा हा गिरगाव चौपाटीवर दाखल झाला. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे बाप्पा हे त्या तराफ्यावर विराजमान झालेच नाही. त्यातच समुद्राला भरती आल्याने पाण्याची पातळीही वाढली होती. त्यामुळे बाप्पाला तराफ्यावर चढवता येत नव्हतं. मात्र, अथक प्रयत्नांनंतर अखेर ३५ तासांनंतर राजाचं विसर्जन पार पडलं.२२ तासांच्या मिरवणुकीनंतर लागबागचा राजा गिरगाव चौपाटीवर पोहोचला. तेव्हा राजाला तराफ्यावर चढवून आरती हणार होती. त्यासाठी हजारोंचा जनसमुदाय गिरगाववर लोटला होता. मात्र, तराफ्यावर चढवण्यात यश आलं नाही. तराफा नवीन असल्याने त्यावर बाप्पाला कसं चढवावं याचं नियोजन चुकलं, त्यातच भरतीची वेळ असल्याने पाणी वाढलं होतं. त्यामुळे तराफा स्थिर राहू शकत नव्हता. तब्बल दोन तास बाप्पाला तराफ्यावर घेण्याचे प्रयत्न झाले, मात्र ते शक्य झालं नाही. अखेर, पाणी कमी झाल्यानंतर बाप्पाला तराफ्यावर चढवण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासून जवळपास आठ -साडे आठ तास बाप्पा हा पाच फूट पाण्यात होता.पाणी ओसरल्यानंतर तब्बल साडे आठ तासांनी बाप्पाची मूर्ती तराफ्यावर चढवण्यात यश आलं, तेव्हा गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया, ही शान कोणाची, लालबागच्या राजाची... या जयघोषांनी सारा



परिसर दुमदमुन गेला. लालबागच्या राजाला तराफ्यावर चढवल्यानंतर पुन्हा काही काळ प्रतीक्षा करण्यात आली. रात्री ८ वाजून १० मिनिटांनी राजाची आरती करण्यात आली आणि त्यानंतर ९ वाजून १२ मिनिटांनी शास्त्रशुद्ध पध्दतीने अरबी समुद्रात बाप्पाचं विसर्जन करण्यात आलं. साश्रू नयनांनी भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला आहे. यावेळी भाविकांची तुफान गर्दी गिरगाव चौपाटीवर झाली होती. आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी भाविकांचा अलोट जनसागर उसळला होता. बाप्पाची अखेर झलक पाहण्यासाठी कालपासून गिरगाव चौपाटीवर भाविकांनी गर्दी केल्याचं दिसून आलं.

## नात्यातला ३ एल बॅलन्स म्हणजे काय?



आपल्या जगण्यात कुटुंब, मित्र मैत्रिणी ही नाती यांना फार महत्त्व आहे. आणि कोणतंही नातं यशस्वी होण्यासाठी काही प्रयत्न जाणीवपूर्वक करावे लागतात. नातं, मग ते नवरा बायकोचं असो, पालक- मुलांचं असो किंवा प्रियकर प्रेयसीचं असो... एकमेकांना परस्परांचा विश्वास वाटला पाहिजे. विश्वासाने नात्यांचे बंध दृढ होतात. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे नात्यातला ३ एल बॅलन्स. याचा अर्थ असा की लॉयल (एकनिष्ठ) लव्ह (प्रेम) आणि तिसरा एल म्हणजे लिबर्टी (स्वातंत्र्य/मोकळीक). ही संकल्पना आपण विस्ताराने समजून घेऊ या.

नात्यात प्रामाणिक असणं वैवाहिक जीवनात दीर्घ आणि निरोगी नातेसंबंधासाठी, केवळ प्रेमच नाही तर निष्ठा देखील महत्त्वाची आहे. स्त्रीला नेहमीच असा जोडीदार हवा असतो जो तिला खास वाटेल आणि तिच्या भावनांची काळजी घेऊ शकेल.पण बऱ्याचदा महिला काळजी घेणारा, समजूतदार आणि बुद्धिमान जोडीदार शोधत असताना हे विसरतात की नातेसंबंधात एकनिष्ठ राहणे खूप महत्वाचे आहे कारण ते तुमचे नाते मजबूत करण्यास मदत करते.आजच्या युगात नात्यांची खोली कमी होत चालली आहे, नात्यातून विश्वास आणि प्रामाणिकपणासारखे गुण नाहीसे होत आहेत. (पान ४ वर)

# मोदींचा तो फोन कॉल अन् ८ वर्षातील सर्वात मोठा निर्णय झाला...

**नवी दिल्ली:** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अध्यक्षतेखालील जीएसटी परिषदेनं महत्त्वाच्या सुधारणा करत सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता चार टॅक्स स्लॅबऐवजी ५ आणि १८ टक्क्यांचे दोनच स्लॅब असतील. अनेक अत्यावश्यक वस्तूंवरील कर शून्यावर आणला गेला आहे. या कर सुधारणेमागे गेल्या डिसेंबरमध्ये पंतप्रधान मोदी यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांना केलेल्या एका फोन कॉलची भूमिका महत्त्वाची आहे.

तुम्ही एकदा जीएसटी बघून घ्या, अशी सूचना पंतप्रधान मोदी यांनी गेल्या डिसेंबरमध्ये अर्थमंत्री सीतारमण यांना केली होती. यानंतर कर रचनेत बदल करण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्याचे परिणाम आठ महिन्यांनी दिसले. वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यानंतर तब्बल ८ वर्षांनंतर यामध्ये आमूलाग्र बदल पाहायला मिळाले.


वस्तू आणि सेवा करांमधील पाच स्लॅब थेट तीनवर आणण्यात आले. त्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहेपंतप्रधान मोदी यांनी गेल्या डिसेंबरमध्ये सीतारमण यांना कॉल करुन जीएसटीमध्ये बदल करण्याची सूचना केली. यानंतर सीतारमण आणि त्यांच्या टिमनं यावर काम सुरु केलं. २०२५-२६चा अर्थसंकल्प सादर तयार करत असतानाही मोदींनी सीतारमण यांना जीएसटीसंदर्भात आठवण करुन दिली होती. तुम्ही जीएसटीवर काम करताय ना, असा सवाल मोदींनी त्यावेळी अर्थमंत्र्यांना विचारला होता.

पंतप्रधानांशी चर्चा केल्यावर सीतारमण यांनी जीएसटीशी संबंधित सगळ्या गोष्टींची समीक्षा सुरु केली. जीएसटीतील सुधारणांसाठी मोदींनी केलेल्या पाठपुराव्याची माहिती अर्थमंत्री सीतारमण यांनी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत दिली.राजस्थानच्या जसलमेरमध्ये जीएसटी परिषदेची शेवटची बैठक झाली. त्यावेळी पंतप्रधानांनी मला फोन केला होता. तुम्ही पुन्हा एकदा जीएसटी बघून घ्या.



व्यापाऱ्यांसाठी अनुदानाची योजना तयार करा. जीएसटीतील स्लॅबमध्ये इतके संभ्रम कशासाठी आहेत? असा सवाल मोदींनी केला होता. अर्थसंकल्प तयार करताना प्राप्तिकरासंदर्भात दिलासा देणाऱ्या उपायांची चर्चा करतेवेळीही त्यांनी जीएसटीची आठवण करुन दिली होती. तुम्ही जीएसटीवर काम करताय ना?, असं मोदींनी त्यावेळीही विचारलं होतं, अशी आठवण सीतारमण यांनी सांगितली.

# महाराष्ट्राच्या प्रथमेशने भारताला जिंकवून दिलं सुवर्णपदक, जागतिक स्पर्धेत प्रथमच सोनेरी यश



**नवी दिल्ली :** भारताने प्रथमच जागतिक तिरंदाजीत कम्पाउंड प्रकारात रविवारी सांघिक सोनेरी यश मिळवले. भारताने फ्रान्सवर २३५-२३३ असा विजय मिळवला. त्यात पुण्यात तिरंदाजीचे प्राथमिक धडे गिरवलेल्या प्रथमेश फुगेचा मोलाचा वाटा आहे. प्रथमेशने सलग सहा वेळा दहा गुण मिळवून भारताच्या विजेतेपदात मोलाची कामगिरी बजावली. दक्षिण कोरियातील ग्वांगजू येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत प्रथमेशसह ऋषभ यादव आणि अमन सैनी वैयक्तिक पदकाचा वेध घेण्यास आज, सोमवारी सुरुवात करतील.

या स्पर्धेत शनिवारी झालेल्या प्राथमिक फेरीच्या सांघिक क्रमवारीत भारत दुसरा आला. वैयक्तिक क्रमवारीत ऋषभ आठवा, तर प्रथमेश १९वा होता. मात्र, याची पुरेपूर भरपाई प्रथमेशने निर्णायक लढतीत केली. सांघिक स्पर्धेतील प्रत्येक लढतीत चार फेऱ्या असतात. त्यात प्रत्येक तिरंदाज दोनदा वेध घेतो. त्यांनी एकमेकाला दिलेली साथ; तसेच प्रोत्साहन मोलाचे आहे. त्यामुळेच ते दडपणाचा चांगल्या प्रकारे सामना करू लागले,फ असे भारतीय संघाचे प्रशिक्षक जीवनजोतसिंग तेजा यांनी सांगितले.

प्रथमेशनेही विजेतेपदानंतर हीच भावना भारतीय संघाच्या कौतुकाच्या वेळी व्यक्त केली. ङ्गहे यश आम्हा सर्वांचे आहे. त्यात सर्वांचा वाटा समान आहे. आम्ही यापूर्वी वर्ल्ड कपमध्ये यश मिळवत होतो. मात्र, जागतिक स्पर्धेतील विजेतेपद आपल्याला दुरावा देत होते. ही मालिका संपुष्टात आणली याचे समाधान आहे,फ अशी भावना प्रथमेशने व्यक्त केल्याचे भारतीय संघासोबतचे फिजिओ डॉ. अरविंद यादव यांनी सांगितले.पिंपरी-चिंचवड येथे आशिष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंदाजीचे प्राथमिक धडे गिरवलेला प्रथमेश दहावी झाल्यानंतर सातारा येथील प्रवीण सावंत यांच्या दृष्टी तिरंदाजी अकादमीत दाखल झाला. प्रवीण सावंत यांच्या अकादमीतून तयार झालेला आणि भारतीय संघात स्थान मिळवलेला तो पहिला तिरंदाज ठरला. त्याने आशिया कप संघात स्थान मिळवले.

# आरक्षणावर आक्षेपांचे सावट; जीआर दुरुस्तीसाठी बैठक होणार, शासन निर्णयात नवे काही नसल्याचा आरोप

**छत्रपती संभाजीनगर :** मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन केल्यानंतर मराठा आरक्षणाबाबत ङ्गहैदराबाद गॅझेटिअरफ लागू करण्याचा शासन निर्णय झाला आहे. त्यानुसार सरसकट जात प्रमाणपत्र मिळणार नसल्याकडे अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे. तसेच शासन निर्णयातील अडसर ठरणारे शब्द बदलून दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या आठवड्यात उपसमितीची बैठक होणार आहे.हैदराबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करणारा शासन आदेश मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर काढण्यात आला आहे. या शासन निर्णयावर अभ्यासक आणि संघटनांनी आक्षेप घेतले आहेत.मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करून सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी सदस्य असलेली समिती नेमली जाणार आहे. मराठा समाजातील भूधारक, भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करणाऱ्या व्यक्तींकडे जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांना १३ ऑक्टोबर १९६७पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे सक्षम प्राधिकारी स्थानिक चौकशी करून खातरजमा करणार



आहेत.स्थानिक चौकशीमध्ये संबंधित जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे गावातील किंवा कुळातील नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व ते कुणबी असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यास तयार असल्यास, तसे प्रतिज्ञापत्र घेऊन गावपातळीवरील स्थानिक समिती, वंशावळ समितीच्या सहाय्याने चौकशी करणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निर्दयी अन् दारुडा बाप; लेकीला रेल्वे स्थानकावर घेऊन गेला अन्.., सोलापुरात घटनेनं खळबळ




**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील कुर्डवाडी रेल्वे स्टेशनवर हृदयद्रावक घटना घडली आहे. दारुड्या आणि निर्दयी बापाने पोटच्या मुलीला धावत्या मालगाडी समोर ढकलून स्वतः ही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार मुंबई येथून निघाला होता.धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथे निघाला होता.कुर्डवाडी रेल्वे स्थानकावर ही हृदयद्रावक घटना घडली आहे.माढा तालुक्यातील कुर्डवाडी येथे गुरुवारी ४ सप्टेंबर रोजी संध्याकाळी रेल्वे स्थानकावर मन हेलवणारे दृश्य होतं. गोंडस चिमुकलीला पाहून प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले होते.शिवानी उमेश चव्हाण (वय ६, रा. तलमोड टांडा, ता. उमरगा, जि. धाराशिव) असे मृत मुलीचे नाव आहे. घटनेनंतर डॉक्टरांनी तपासून मृत शिवानीला मृत घोषित केले. निर्दयी बाप उमेश विश्वनाथ चव्हाण (वय ३०) यास डोक्यावर व पाठीवर गंभीर दुखापत झाल्याने प्रथमोपचार करून सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलला हलवण्यात आले आहे. सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे. लोहमार्ग पोलिसांनी उमेश यावर खुनाचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. गुरुवारी सायंकाळी प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर मनाला चटका लावणारी घटना घडली आहे. उमेश चव्हाण याने स्वतःच्या सहा वर्षीय मुलीला गाडीसमोर ढकलून तिचा जीव घेतला. त्यानंतर त्याने स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला मात्र तो जखमी अवस्थेत बचावला. कुर्डवाडी रेल्वे स्टेशनवरील फूटओव्हर ब्रिज जवळ जमलेली गर्दी पाहून सुरक्षा पथक तेथे पोहोचले असता, एक लहान मुलगी रेल्वे ट्रॅकवर बेशुद्धावस्थेत आढळली. तसेच तिचा वडील गंभीर जखमी अवस्थेत बाजूलाच पडलेले होता. तत्काळ उपस्थित प्रवाशांनी व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना प्लॅटफॉर्मवर आणले.

# याला म्हणतात ट्रेलर, ललित-ऋताच्या रोमान्सवर प्रेक्षक फिदा; आरपारमध्ये प्रेम, हार्टब्रेक अन् ड्रामा!



**मुंबई:** महाराष्ट्राची क्रश अशी ओळख मिळवणारी ऋता दुर्गुळे आणि चॉकलेट बॉय ललित प्रभाकर यांच्या आरपार या सिनेमाची गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चा होती. येत्या १२ सप्टेंबर रोजी हा सिनेमा रीलिज होणार आहे. सिनेमा रीलिज होण्यासाठी अवघा १ आठवडा शिल्लक असताना आरपारचा धमाकेदार ट्रेलर रीलिज झाला आहे. या सिनेमात प्रेम, रोमान्स, प्रेमातील कडाक्याचं भांडण, प्रेमभंग आणि ड्रामा इ. असं सर्वकाही पाहायला मिळणार आहे. याचीच झलक दाखवणारा ट्रेलर ७ सप्टेंबर रोजी रीलिज झाला.समर आणि प्राची या एकमेकांपासून दूर न राहू शकणाऱ्या प्रेमीयुगूलाची कहाणी आरपारमध्ये पाहायला मिळणार आहे. त्यांच्यात अतिशय प्रेम असले तरी, गैरसमज, वाद आणि दुरावाही आहे. त्यांच्या कुटुंबाची कहाणीही यामध्ये आहे. एकमेकांना मॅनिफेस्ट करणारे अमर-प्राची एकत्र येतील का, याचा उलगडा मात्र १२ सप्टेंबर रोजीच होईल.ट्रेलर रीलिज होतात प्रेक्षकांनी अक्षरशः कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. मनोरंजन विश्वातील कलाकार मंडळींसह चाहत्यांनीही या ट्रेलरचे कौतुक केले. याला म्हणतात ट्रेलर, तुमची केमिस्ट्री खूप सुंदर आहे, या ट्रेलरची वाट पाहत होतो, या सिनेमासाठी खूप उत्सुक आहोत, अशा असंख्य कमेंट या ट्रेलरवर आल्या आहेत. सोशल मीडियावर ललित-ऋताच्या केमिस्ट्रीचे कौतुक करताना प्रेक्षक थकत नाही येत.दरम्यान सिनेमाच्या या रीलिज डेटबद्दल आणखी एक खास बाब आहे. ऋता आणि ललित यांचा वाढदिवसही १२ सप्टेंबर रोजीच असतो. त्यामुळे या दोघांच्याही चाहत्यांसाठी हा सिनेमा म्हणजे एक खास गिफ्टच असणार आहे.लिऑन्स मीडिया प्रोडक्शन प्रस्तुत आरपारची निर्मिती नामदेव काटकर आणि रितेश चौधरी यांनी केली आहे. ललित स्वतः या चित्रपटाचा सहनिर्माता आहे, तर सुशांत माळी सुपव्हायजिंग प्रोड्युसर आहेत. सिनेमाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन अशी संपूर्ण जबाबदारी गौरव पत्की यांनी सांभाळली आहे.दरम्यान सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांना आवडला असला तरी यादिवशी दशावतार आणि बिन लग्नाची गोष्ट हे आणखी दोन मराठी चित्रपट रीलिज होत आहेत. एकाच दिवशी आघाडीच्या कलाकारांचे तीन मराठी चित्रपट रीलिज होत असल्याने प्रेक्षकांनी नाराजीही व्यक्त केली आहे.

# जिथे तोडफोड केली, दहशत माजवली; तिथेच पोलिसांकडून गुंडांचा करेक्ट कार्यक्रम.



**नागपूर :** पैशांच्या किरकोळ वादातून शांतीनगर परिसरात बुधवारी रात्री शस्त्रांनी सुसज्ज गुंडांनी केलेल्या तांडवामुळे परिसरात भीतीचे सावट पसरले होते. एनआयटी गार्डनजवळ या टोळक्याने २० पेक्षा जास्त दुचाकी व चारचाकी वाहनांची तोडफोड केली. परंतु पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही तासांतच १७ आरोपींना ताब्यात घेतले आणि त्यांची धिंड काढून नागरिकांसमोर उभे केले. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबाबत विश्वास वाढला असून गुंडगिरीविरोधात ठोस संदेश गेला आहे.ही घटना बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. शैलेश नावाच्या एका तरुणाचा पैशांच्या वादावरून काही युवकांशी वाद सुरू होता. वाद वाढताच आरोपींनी शैलेशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र उपस्थित लोकांनी मध्यस्थी करून मारहाण थांबवली. त्यावेळी आरोपींनी ङ्कपाहून घेऊङ्क अशी धमकी देत घटनास्थळ सोडले. काही वेळातच सुमारे १५ ते २० जण पुन्हा तलवारी, लाठ्या घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शैलेशचा शोध घेतला, पण तो न मिळाल्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक व तोडफोड सुरू केली. काही मिनिटांतच २० हून अधिक वाहनांचे नुकसान झाले. आरडाओरड व दहशत निर्माण करणाऱ्या या कृतीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले.यावेळी परिसरात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद वितरण सुरू होते. अचानक झालेल्या गोंधळामुळे नागरिक घाबरून गेले. महिलांमध्ये व ज्येष्ठांमध्ये भीती निर्माण झाली आणि काहींनी सुरक्षिततेसाठी घरांचा आश्रय घेतला. नागरिकांनी तात्काळ पोलिसांना कळविले. माहिती मिळताच पोलीस उपायुक्त राहुल मदने, शांतिनगर पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि क्राइम ब्रांचचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अल्पावधीतच १७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. नागरिकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी पोलिसांनी आरोपींना घटनास्थळावर आणून त्यांची परिसरात धिंड काढली. या मुळे पीडितांना आरोपींची ओळख पटवणे सोपे झाले आणि लोकांनी थेट त्यांच्याविरुद्ध तक्रारी नोंदवल्या. नागपूर शहरात गुंडगिरी सहन केली जाणार नाही असा स्पष्ट संदेश पोलिसांनी या कारवाईदरम्यान दिला. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी घटनेला गंभीर मानून आरोपींवर कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी नागरिकांना घाबरून न जाता पोलिसांना सहकार्य करण्याचे आणि योग्य माहिती देण्याचे आवाहन केले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दसरा मेळाव्याला ठाकरे बंधू पुन्हा एकत्र येणार? कार्यकर्त्यांची इच्छा, पण संजय राऊत म्हणाले...


**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू राजकीय युतीची घोषणा करणार की नाही याबाबतचे गूढ अद्याप उकलले नसले तरी वाढदिवस तसेच गणेशोत्सवाप्रमाणे हे बंधू आता दसरा मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र येणार का, याविषयी जोरदार चर्चा सुरू झाली आहे.शिवसेना उबाठा पक्षाच्या काही नेत्यांच्या मते हे बंधू दसरा मेळाव्यासाठी एकत्र येतील. तर काही नेत्यांच्या मते दसरा मेळावा हा शिवसेनेचा असल्याने राज ठाकरे मेळाव्याला येणार नाहीत. मात्र तरीही दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते मात्र ठाकरे बंधू दसऱ्याच्या निमित्ताने पुन्हा एकत्र यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.हिंदीसक्तीच्या विरोधात ठाकरे बंधू मेळाव्याच्या निमित्ताने सर्वप्रथम एकत्र आले. तेथूनच हे बंधू एकत्र येणार असल्याच्या चर्चेला तोंड फुटले. त्यानंतर राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाला थेट मातोश्रीवर जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. त्याच्या पुढचे पाऊल म्हणून उद्धव ठाकरे सहकुटुंब गणेशदर्शनासाठी राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी गेले.ठाकरे बंधूंच्या या भेटीगाठीचे सत्र आणखी पुढे जावे यासाठी आता हे बंधू आगामी दसरा मेळाव्याच्या निमित्ताने शिवाजी पार्क मैदानावर एकत्र यावेत अशी अपेक्षा दोन्हीकडचे कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत. यालाच दुजोरा देताना शिवसेना उबाठा पक्षाचे नेते सचिन अहिर यांनी एक विधान केले आहे. "येत्या दसरा मेळाव्याला तुम्हाला चांगली बातमी मिळेल, कदाचित राज ठाकरे यांना आमच्या पक्षाकडून दसरा मेळाव्याचे निमंत्रण दिले जाऊ शकते", असे त्यांनी म्हटले आहे. मात्र, याच मुद्द्यावर शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मात्र वेगळी प्रतिक्रिया नोंदवली.दसरा मेळाव्यात हे दोघे एकत्र येण्याबाबत मला काहीच माहिती नाही. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात उत्तम संवाद सुरू आहे हे



मी तुम्हाला खात्रीने सांगतो. दसरा मेळावा हा शिवसेनेचा असतो. माझ्या माहितीप्रमाणे राज ठाकरेंचा गुढीपाडव्याला दुसरा वेगळा मेळावा असतो. आमची विचारसरणी मराठी माणसांसाठी एक आहे. मात्र दोन्ही पक्ष वेगळे असल्याने तसे होणे शक्य नाही. दोन्ही पक्षाचे मेळावे वेगळे होतात. भविष्यामध्ये काम करण्यासाठी एकत्र येण्याबाबत आमचे एकमत झाले आहे", असेही त्यांनी सांगितले.

## डिजिटल शेतीकडे वाटचाल! महाॲग्री धोरणामुळे शेतकऱ्यांना मिळणार नवीन तंत्रसुविधा

**मुंबई:** महाराष्ट्र कृषी- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ या धोरणास मंगळवारी मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दर्शविला असून, या निर्णयामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषण यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत. या धोरणामुळे राज्यातील ॲग्रिस्टेक, महा-ॲग्रिस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डीबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय रचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत या धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नावीन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नावीन्यता केंद्र काम करतील.आयआयटी/आयआयएससीसारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्र स्थापण्यात येतील. त्याशिवाय डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती-आधारित डेटा देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषी डेटा एक्स्चेंज आणि सँडबॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल, या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य सरकारचे शेती



संबंधीत सर्व डेटाबेस जोडण्यात येतीलकृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी व शेतकरी-केंद्रित बनवण्यासाठी विस्तार उपक्रम राबवण्यात येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून जनरेटिव्ह आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा उपयोग / करून शेतकऱ्यांना मराठीतून वैयक्तिक सल्ला दिला जाईल. या उपक्रमांतर्गत मराठीत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅटबॉट्स, व्हॉईस असिस्टंट्स यांची मदत घेतली जाईल. त्याद्वारे पीक उत्पादन, रोग-कीड व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजारभाव व योजनांची माहिती देण्यात येईल.अन्नसुरक्षा, पुरवठा साखळीतील पारदर्शकता, अन्न गुणवत्ता हमी आणि शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि क्यू-कोड तंत्रज्ञानावर आधारित राज्यव्यापी शोधक्षमता व गुणवत्ता प्रमाणीकरण प्लॅटफॉर्म उभारण्यात येईल. या प्लॅटफॉर्मद्वारे शेतापासून ग्राहकापर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेती पद्धती, कापणीपश्चात प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र इत्यादी बाबींचे डिजिटल आणि जिओ-टॅग केलेली नोंदवही तयार करेल.राज्यातील खासगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना अनिवासी भारतीयांच्या मुलांना व पाल्यांना प्रवेश मिळावा, याकरिता प्रवेश व शुल्क विनियमन अधिनियम, २०१५ मधील व्याख्येत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## पान ३ वरून... नात्याला ३ एल....

अशा परिस्थितीत हे गुण नाते अतूट बनवतात, त्याचबरोबर तुमचा जोडीदार किंवा मित्र निष्ठावान आहे की नाही हे देखील तुम्हाला कळेल.

### जोडीदार किंवा मित्र विश्वासार्ह

प्रत्येकाच्या आयुष्यात चढ-उतार येतात, आनंद-दु:ख, यश-अपयश. अशा परिस्थितीत, आपल्याला नेहमीच आपला जोडीदार किंवा मित्र कठीण काळात आपल्यासोबत असावा असे वाटते. जर तुमचा जोडीदार किंवा मित्र अशा वेळी तुम्हाला मदत करत असेल तर तो तुमच्याशी एकनिष्ठ असतो.बऱ्याचदा आपल्या मनात अनेक गोष्टी चालू असतात पण आपण त्या नेहमीच उघडपणे बोलू शकत नाही. पण जेव्हा तुमचा जोडीदार किंवा मित्र विश्वासार्ह असतो, म्हणजेच निष्ठावंत असतो, तेव्हा त्या गोष्टी आणि काळजी तुमच्या जोडीदारासोबत किंवा मित्रासोबत शेअर करणे खूप सोपे होते.

### एकमेकांशी संवाद साधणे खूप महत्वाचे

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत, कधीकधी तुमच्या जोडीदारासाठी, कुटुंबासाठी, मित्रांसाठी वेळ काढणे कठीण होते. अशा परिस्थितीत, जर तुमचा जोडीदार किंवा मित्र तुमच्यासाठी वेळ काढत असेल आणि तुमच्यासोबत दर्जेदार वेळ घालवत असेल, तर तुम्हाला हे समजले पाहिजे की तो तुमच्याशी एकनिष्ठ आहे.

### एकमेकांशी संवाद साधणे खूप महत्वाचे

आजच्या काळात, सोशल मीडिया आणि इंटरनेटवरील तुमच्या क्रियाकलापांबद्दल तुमच्या जोडीदाराशी प्रामाणिक राहिल्याने तुमचे नाते मजबूत होते कारण जेव्हा आपण स्वत:शी खरे आणि प्रामाणिक असतो तेव्हा आपल्याला काहीही लपवण्याची गरज नसते. नातेसंबंधातील प्रामाणिकपणासाठी, एकमेकांशी संवाद साधणे खूप महत्वाचे आहे, विशेषत: जेव्हा तुम्हाला नातेसंबंधातील एखाद्या गोष्टीबद्दल समस्या किंवा गैरसमज असेल, कारण जेव्हा जोडीदार प्रामाणिक असतो तेव्हा तो नातेसंबंध यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतो.

### नात्यामध्ये प्रेम असणे खूप महत्वाचे

कोणत्याही नात्यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे विश्वास. तुमचा जोडीदार किंवा मित्र कितीही चांगला असला तरी, जर तो/ती प्रामाणिक नसेल तर ते नाते जास्त काळ टिकणे शक्य नाही. प्रेम हे सहसा शारीरिक आकर्षणावर आधारित असते, तर नातेसंबंध भावनिक बंधावर आधारित असतात. कोणत्याही नात्याला दीर्घायुष्य मिळावे यासाठी त्या नात्यामध्ये प्रेम असणे खूप महत्वाचे असते. महिला असोत किंवा पुरुष, प्रत्येकाला असा जोडीदार हवा असतो जो त्यांची काळजी घेईल आणि त्यांच्यावर खूप प्रेम करेल.

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या संकल्पनेतून साजरा झाला सामाजिक भान जपणारा गणेशोत्सव...

## गणपती बाप्पांना साश्रूनयनांनी भावपूर्ण निरोप संघर्षशील व्यक्तींचा दररोज सन्मान...

जनसंचलन/ डोणगाव

क्रांतिकारी गणेशोत्सव मंडळाचा विसर्जन सोहळा आज उत्साहात पार पडला. गणरायाच्या आरत्या, डफडे व डि जे चा गजर आणि भावनिक वातावरणात गणपती बाप्पांना साश्रूनयनांनी निरोप देण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी यंदा सामाजिक भान जपत आगळावेगळा उत्सव साजरा केला. सौ. शर्वरीताई तुपकर यांच्या संकल्पनेतून उभारलेला शेतकरी आंदोलनाचा देखावा समाजमाध्यमांवर विशेष गाजला. दररोजच्या आरतीचा मान समाजातील वंचित व संघर्षशील व्यक्तींना देण्यात आला. यात दत्तक कन्या, शहीद जवानांच्या पत्नी, एमबीबीएससाठी मुलाला शिकवणारा पंक्चर कामगार, सलून व्यवसायातून पत्नीला शिक्षण देऊन नोकरीत रुजू करणारा व्यक्ती, दुध उत्पादक शेतकरी, रिक्षा चालवणारी महिला, विशेष सेवा पदकप्राप्त पोलिस कॉन्स्टेबल, नर्सेस तसेच सेवानिवृत्त सैनिकांचा समावेश होता. प्रत्येक आरतीतून संघर्ष, कर्तृत्व आणि प्रेरणा यांचा गौरव झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची परंपरा सुरू करताना सामाजिक बांधिलकी, लोकजागृती आणि एकोप्याचा संदेश देण्याचा विचार मांडला होता. यंदाच्या क्रांतिकारी गणेशोत्सव मंडळाच्या उपक्रमातून हाच संदेश प्रत्यक्षात साकार झाल्याची भावना जनमानसात उमटली आहे, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. यावेळी तरूणांनी विशेष गर्दी केली होती. परिसरातील नागरिक व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. डफड्यांच्या तालावर रविकांत तुपकर यांच्या परीवारातील सर्वांनी. चौकट डान्स केला . यावेळी महीला भगीनी पण थिरकल्या रविकांत तुपकर व सौ शर्वरीताई तुपकर यांनी फ ुगडी खेळत आनंद द्विगुणित केला. विसर्जना वेळी गणपती बाप्पां चं ट्रॅक्टर चालवत रविकांत तुपकर यांनी स्वतः सारथ्य केले गणपती विसर्जनाच्या वेळी वाजत-गाजत, डफडे व डि जे च्या गजरात भावपूर्ण वातावरणात बाप्पांना निरोप देण्यात आला. पैनगंगा



नदी मध्ये बाप्पांचं विसर्जन केले गेले. उत्साह आणि ओढीबरोबरच डोळ्यांत पाणी आणणारा हा निरोपाचा क्षण सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या घोषणांनी आसमंत दणाणून गेला यावेळी रविकांत तुपकर यांनी गणपती बाप्पां ना प्रार्थना केली की शेतकऱ्यांना कर्जमुक्ती ची सद्बुद्धी सरकारला होऊ दे शेतकरी सुखी समृद्ध व प्रगत होऊ दे . शेतमालाला योग्य भाव मिळुन शेतकऱ्यांच्या कष्टाचं चीज होऊदे हा गणेशोत्सव केवळ धार्मिक विधींच्या चौकटीत न राहता समाजातील वंचित व प्रेरणादायी घटकांना गौरवणारा, समाजजीवनाला नवीन दिशा दाखवणारा आणि संघर्षातून प्रेरणा देणारा ठरल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# मेहकरात ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात! आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते मिठाईचे वाटप

जनसंचलन/मेहकर

मेहकर शहरातील मुस्लिम बांधवांच्या वतीने (ता. ५सप्टेंबर) मोठ्या उत्साहात व जल्लोषात मरकझी (मुख्य) जुलुसे ईद-ए-मिलादुन्नबीचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम बांधवातर्फे शहरातील इमामबाडा चौक , गवळीपुरा चौक, मदीना चौक, माळी पेठ, छोटा इमामबाडा चौक अशा विविध परिसरातून ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त भव्य मिरवणूक (जुलूस) काढण्यात आली. आणि जामा मज्जिद येथे विश्व शांतीसाठी प्रार्थना करून शेवट करण्यात आला. (जुलूस) च्या मिरवणुकीत मुस्लिम बांधवांनी, तरुण युवक व अबाल-वृद्धांनी धार्मिक ध्वज पताका घेत जशने ईद मिलादुन्नबी जिंदाबाद, नारा ए तकबीर



अल्लाह् अकबर अशा विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सदर मिरवणूक गवळी पुरा मदीना चौक येथे आली असता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात,प्रा आशिष रहाटे,किशोर गारोळे यांच्या हस्ते मिठाई व पाणी वाटप करण्यात आले या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख प्रा आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाभाऊ पांडव, मेहकर शहर अध्यक्ष किशोरभाऊ गारोळे, युवा सेना तालुका अध्यक्ष ॲड आकाश घोडे, ॲड संदीप गवई, रमजान चौधरी, बाबू गवळी, अकबर गवळी, लल्ला गवळी, इमाम गवळी राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हा प्रमुख निसार अन्सारी, रफिक शेख,अन्सार शेख, यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आजचा बालक उद्याचा सुज्ञ भारतीय नागरिक घडवायचा असेल तर बालवयात धम्म संस्कार देणे आवश्यकपूजनीय -यश भंतेजी



जनसंचलन/बुलढाणा

पूजनीय यश भंतेजी. धम्म संडे स्कूलचा दुसरा रविवारी, अपेक्षा पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या उपस्थिती... मैत्रेय बुद्ध विहार समिती नागसेन नगर खामगाव रोड बुलढाणा वतीने दिनांक ३१.०८.२०२५ पासून सुरू झालेल्या धम्म संडे सुरू झालेली आहे. आज दुसरा क्लास घेण्यासाठी, महिला मंडळ यांनी सुगंधित फुलाचा वर्षाव करून पूजनीय भंतेजीचे स्वागत करण्यात आले, वंदनीय भंतेजींच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध तथा विश्ववंदनीय भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे यांच्या प्रतिमेला दीप धूप पुष्पहार अर्पण करून त्रिवार वंदन करण्यात आले. माननीय समितीचे अध्यक्ष आयु. बबनराव चव्हाण तथा समितीचे संचालक यांच्यामार्फत पूजनीय भंतेजींचे पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. भंतेजीचे आसन आसनस्थ होताच सर्व विद्यार्थ्यांमध्ये पिन ड्रॉप सायलेन्स निर्माण झाले व एकाग्रता होऊन प्रवचनामार्फत लहान लहान कथांचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना धम्म उपदेश देण्यात आला. पूजनीय यश भंतेजीचे प्रवचन, लहान लहान कथेमार्फत विद्यार्थ्यांच्या बालमनावर धम्म ज्ञानाचे संस्कार घडत आहेत. याचे अनुकरण सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये दिसून आलेले आहेत. नित्य नियमाने दिलेला होमवर्क विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे पूर्ण केलेला आहे असे दिसून आले. भंतेजीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर अचूक मिळाल्यामुळे भंतेजी सुद्धा अतिशय आनंद व्यक्त केला आहे, आधुनिक काळातील विद्यार्थी अतिशय हुशार असून थोड्याच काळामध्ये यांच्यामध्ये खूप काही बदल घडवणार असे आश्वासन दिले. पालक सुद्धा आपल्या पाल्यावर फार आनंदी असून भंतेजीने दिलेला उपदेशाप्रमाणे वागत आहेत, त्यामुळे पालक सुद्धा धम्म संडे स्कूलमध्ये आवर्जून हजेरी लावत आहे. एरवी टीव्ही व मोबाईल पासून विद्यार्थी दूर होत असताना पालक मनावर फार सकारात्मकतेचा भावना रुजत आहे. आजच्या धम्म संडे क्लास साठी आयुष्यमान भैयासाहेब पाटील व त्यांच्या सपत्नी त्यांचा संपूर्ण परिवार विद्यार्थ्यांना तसेच संपूर्ण विहारातील पालकांना अल्पोपरासाठी धम्मदान स्वरूपात विनम्रतेने अर्पण केले. त्यांच्या या संडे धम्म स्कूल धम्मदानाचा उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. व साधु साधू साधू शुभेच्छा तथा आशीर्वाद देण्यात आले. तसेच आयुष्यमान कैलास खिल्लारे साहेब रिटायर्ड आर्मी मेजर यांनी वाढलेल्या विद्यार्थ्यांच्या एक वही व एक पेन देऊन अतिशय मौल्यवान असे धम्मदान अर्पण केले. यांना सुद्धा उपस्थित विहारातील मान्यवरांनी साधू साधू म्हणून शुभेच्छा तथा आशीर्वाद अर्पण केले. विहाराची रंगरंगोटी फुल सजावट आसन व्यवस्था तसेच स्वच्छता ही संपूर्ण व्यवस्था विहाराच्या महिला मंडळांनी चोखपणे बजावली, विशेष उपस्थितीमध्ये शाहू फुले विचाराचे खंदे समर्थक व आंबेडकरी चळवळीचे झुंजार भीम सैनिक आयु. पी आर इंगळे साहेब, तसेच आयु. प्रेम इंगळे, वानखेडे मिलिंद तायडे मिलिंद झीने, आयु. बाबुराव इंगळे. ज्येष्ठ पत्रकार आयुष्यमान बाबासाहेब जाधव यांची विशेष उपस्थिती मिळाली, आयु. दीपक मनवर, प्रमोद कंकाळ, आयु. धम्मपाल अवसरमोल साहेब रिटायर फौजी, संगीत विशारद शेगावकर सर, सुनील जाधव, पोळके साहेबतथा इतर मान्यवर विशेष परिश्रम मिळाले. अतिशय महत्त्वाच्या कामानिमित्त आयुष्य विजयजी वाकोडे बाहेरगावी असल्यामुळे त्यांच्या मार्फत मिळालेला संदेश विद्यार्थ्यांना वाचून दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक शरद नगराळे यांच्यामार्फत होऊन कार्यक्रमाची यशस्वीरित्या सांगता करण्यात आली व पुढील रविवारी या ही पेक्षा जास्त विद्यार्थी व पालक येथील हे याचे नियोजन समितीतर्फे करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

# वृत्तेश्वरा लेखणीचे टोक टोकदार राहू दे!

## बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे साकडे!

जनसंचलन/बुलढाणा

येथील पत्रकारांनी पहिल्यांदाच वृत्तेश्वर गणेश मंडळाची स्थापना करून पत्रकार भवन परिसरात श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली. जिल्हा पत्रकार संघाच्या संकल्पनेतून पार पडलेल्या गणेशोत्सवात विविध सामाजिक उपक्रम तथा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये, गत दहा दिवसांत भजन स्पर्धा, निंबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच काव्य मैफिलीच्या प्रस्तुतीतून कलाकारांनी श्री गणराया चरणी अभिवादन केले. शनिवारी वृत्तेश्वर गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. पत्रकार बांधवांनी काढलेल्या विसर्जन मिरवणुकीने शहरवासीयांचे लक्ष वेधले होते. बुलढाण्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या पत्रकारांनी पहिल्यांदाच सामूहिक गणेशोत्सव साजरा केला. दरम्यान, गत दहा दिवसांत विविध प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच लोकाभिमुख मान्यवरांच्या हस्ते वृत्तेश्वर गणरायाची आरती झाली. सर्वच मान्यवरांनी जिल्हा पत्रकार संघाच्या गणेश मंडळाचे व त्यांच्या आयोजनाचे भरभरून कौतुक केले. हा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने वैचारिक व सामाजिक एकात्मिकतेचा संदेश देणारा ठरला, अशी भावना अनेकांनी३ व्यक्त केली. विशेष म्हणजे, वेदांमध्ये श्री गणेशाची १०८ नावे आहेत. मात्र, पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी भवृत्तांचा ईश्वर अशा संकल्पनेतून पत्रकारांच्या गणेश मंडळाला वृत्तेश्वरफ असे नाव दिल्याने या नावाची चर्चा सर्वदूर झाली. यावेळी पत्रकार सर्वश्री चंद्रकांत बर्दे, राजेश डीडोळकर, नितीन शिरसाट, भानुदास लकडे, सुधाकर आहेर, प्रा.सुभाष लहाने, प्रेमकुमार राठोड, गणेश निकम, जितेंद्र कायस्थ, शिवाजी मामलकर, विजय देशमुख, रविंद्र गणेशे, बाबासाहेब जाधव, ब्रम्हानंद जाधव, डॉ.भागवत वसे, किशोर खंडारे, दिपक मोरे, सुरेखाताई सावळे, राम हिंगे, सुधाकर मानवतकर, मृणालताई सावळे, अजय राजगुरे, तुषार यंगड, अजय काकडे, आकाश भालेराव, अभिषेक वरपे, मोहम्मद फरजान यांच्यासह भुषण पंजाबी, ॲड.रमेश भागीले, गणेश नरोटे, सुभाष देशमुख, सिध्दी डीडोळकर यांची उपस्थिती होती. वृत्तेश्वर मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीने शहरवासियांचे लक्ष वेधल्याचे दिसून आले. ट्रॅक्टरवर सजावट करून वृत्तेश्वर गणरायाची मूर्ती बसविण्यात आली होती. पत्रकार भवन परिसरातून निघालेली मिरवणूक संगमचौक मार्गे श्री शिवाजी विद्यालयाजवळील सुवर्ण गणेश मंदिरा समोर पोहोचली. मंदिरातील गणेश मूर्तीला पुष्पांजली अर्पण करीत मिरवणूक पुन्हा संगम चौक मार्गे सागवन येथील नदीच्या दिशेने निघाली. दरम्यान, ढोल - ताशांच्या ठेक्यावर सर्वच पत्रकार मनमुराद थिरकले. नदीकाठी पोहोचल्यावर गणेशाच्या मूर्तीचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले.



# वृद्ध महिलेला अज्ञात वाहनाने चिरडले!

जनसंचलन/बुलढाणा



शहरातील जिल्हाधिकारी कार्यालया जवळ ट्रेझरी ऑफिस समोर काल रात्री अज्ञात वाहनाने वृद्ध महिलेला चिरडल्याची घटना समोर आली आहे. सकाळी पोलीस घटनास्थळी पोहोचले होते. मृतक वृद्धा ही भिकार अवस्थेत आढळून आलेली आहे. शहरात वाहनांची वेगमर्यादा निश्चित राहिलेली नाही. वाहतूक पोलीस सुद्धा कर्तव्य व्यवस्थित पार पाडत नसल्याचे चित्र आहे.नेमके वाहतूक पोलीस त्यांना दिलेले टार्गेट पूर्ण करण्यासाठी बायपास वर दिसून येतात. शहरात चौकातील सिग्नल व्यवस्था विस्कळीत आहे.याकडे लोकप्रतिनिधींचे व पोलीस विभागाचे दुर्लक्ष आहे.त्यामुळे शहरातील विविध रस्त्यांवरून बेफाम वाहतूक सुरू असते.संगम चौक,कारंजा चौक, त्रिशरण चौक, जयस्तंभ चौक येथे नेहमी वाहतुकींची कोंडी होते.मात्र येथे वाहतूक सुरळीत करण्यास एकही पोलीस दिसून येत नाही.परिणामी अपघाताचे प्रमाण वाढत आहे. काल रात्री ट्रेझरी ऑफिस समोर रात्री अज्ञात वाहनाने वृद्ध महिलेला चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.पोलीस तपास करत आहेत.

